**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अधिसभा निवडणूक २०२२**

**अधिसभेच्या निवडणूकीसाठी नोंदणीकृत मतदार यादीतील मतदार नोंदणीसाठी संमती अर्ज पाठवणेबाबत**

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अधिसभेवरील दहा नोंदणीकृत पदवीधरांच्या निवडणूकीसाठी नोंदणीकृत मतदार यादीतील मतदार नोंदणीसाठी संमती अर्ज ऑनलाईन आमंत्रित करण्यात येत आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील संबधीत तरतुदी अंतर्गत विद्यापीठ अधिसभेच्या पंचवार्षिक निवडणूका प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. दहा नोंदणीकृत पदवीधरांच्या निवडणूकीसाठी मतदार यादीत स्वतःची नाव नोंदणी करण्यासाठी अंतीम तारीख ५ ऑगस्ट, २०२२ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत ठेवली आहे. नोंदणीकृत पदवीधरांच्या खंड १ ते ६ इलेक्ट्रोल रोल विद्यापीठाच्या वेबसाईटवर संबधित पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

तरी ज्या पदवीधारकांनी यापूर्वी नोंदणी केलेली आहे आणि त्यांचे नाव खंड १ ते ६ इलेक्ट्रोल रोल मध्ये आहे, त्यांनी विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावरील निवडणूक पोर्टल २०२२ परिशिष्ट 'अ' मध्ये अर्ज भरण्यासाठी दिलेल्या लिंकवर जावून विहित मुदतीत अर्ज सादर करावयाचा आहे.

**लिंकवर अर्ज सादर न केल्यास मतदान करता येणार नाही**

विद्यापीठ अधिसभा निवडणूक २०२२ यापूर्वी नोंदणीकृत पदवीधारकांनी आपली नावे नोंदविली असून त्याचा समावेश खंड १ ते ६ मध्ये आहे. त्यांना लिंकवर जावून अर्ज सादर करावयाचे आहेत. जर त्यांनी दिलेल्या लिंकवर अर्ज सादर न केल्यास त्यांना अधिसभा निवडणूकीस मतदान करता येणार नाही, याची नोंद घ्यावयाची असून सर्वांनी आपली नावे नोंदवावीत, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव तथा निवडणूक निर्वाचन अधिकारी डॉ. तुषार देशमुख यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी उपकुलसचिव श्री प्रमोद तालन (९९२२९९३२७३), सहा. कुलसचिव श्री आर.जे. सयाम (९४२३६४९३४६) व अधीक्षक श्री उमेश लांडगे (९४२१७८५२५८) यांच्याशी संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दि. २२/०७/२०२२.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

This document was created with the Win2PDF “Print to PDF” printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/